## फौ.कि.चौ.अर्ज क्र.६९/२०१९ अर्ज निशाणी १४ खालील आदेश

(CNR-MHNS160002982019)

०१. सदर अर्जाद्वारे सामनेवाले क्र.१ यांनी त्यांचा जबाब दाखल करण्यासाठी उशीर माफ होऊन, त्यांचा जबाब दाखल करून घेण्यासाठी विनंती केली आहे.

०२. अर्जदारातर्फे अर्जास तीव्र आक्षेप घेवुन असे कथन केले आहे की, सा.वाले यांनी अर्जदारास मानसिक त्रास देण्याच्या हेतुने व अर्जदारचे कामकाज लांबणीवर टाकण्यासाठी विहीत मुदतीत त्यांचा जबाब दाखल केलेला नसल्याने अर्ज नामंजुर करण्यास विनंती केली आहे.

०३. अर्जातील सर्व कागदपत्र बारकाईने पाहणी केली. सामनेवाले क्र.१ हे दिनांक १६/०४/२०१९ रोजी त्यांच्या वकीलांमार्फत हजर झाले त्यानंतर त्यांना पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी त्यांचा लेखी जबाब विहित मुदतीत दाखल केलेला नाही. त्यांच्यात त्यांचा हलगर्जीपणा आहे. परंतु अर्जाचे स्वरूप पाहता सामनेवाले क्र. १ यांना संधी देणे न्यायसंगत वाटते. जर तसे केले नाही तर त्यांच्या बचावाचे दरवाजे बंद होतील व सदरील अर्ज हा गुणावगुणावर निकाली लागणार नाही व त्यांच्या कायदेशीर अधिकारावर गदा येईल, तरी न्यायाच्या दृष्टीने सामनेवाले क्र. १ यांना बचावाची संधी देणे विधीसंगत वाटते. सदर प्रकरणातील वस्तुस्थिती व दाव्याचे स्वरूप पाहता, अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतात. करिता खालील आदेश.

:: **आदेश** ::

१. निशाणी क्र.१४ अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाले क्र.१ यांनी खर्च म्हणुन रु.३००/-(रूपये तीनशे फक्त) अर्जदारांना द्यावे.

३. आदेशाची पुर्तता पुढील तारखेपर्यंत न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

सही/-

दिनांक - १६.०९.२०१९

(सुनिल बा. वाळके)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
चांदवड.